# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों.क्र.६२१८/२२/अ.क्र.४६०३/२५/०१

**श्री. मघेना किशोर मटकर**
१८९/१९२३, सेक्टर-६,
सी.जी.एस. कॉलनी, कानेनगर,
अॅन्टॉप हिल, मुंबई – ४०००३७.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ.प्र.)**
बृहन्मुंबई महानरपालिका,कार्यकारी अभियंता (इ.प्र.) शहर-१ यांचे कार्यालय,
नविन महापालिका इमारत भगवान वाल्मिकी चौक, विद्यालंकार मार्ग,
हनुमान मंदिरच्या समोर, साल्ट पॅन रोड, अन्टॉप हिल, वडाळा पूर्व मुंबई- ४०० ०३७.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.) शहर-३**
बृहन्मुंबई महानरपालिका,कार्यकारी अभियंता (इ.प्र.) शहर-१ यांचे कार्यालय,
नविन महापालिका इमारत भगवान वाल्मिकी चौक, विद्यालंकार मार्ग,
हनुमान मंदिरच्या समोर, साल्ट पॅन रोड, अन्टॉप हिल, वडाळा पूर्व मुंबई- ४०० ०३७.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७.०१.२०२६</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २३.०५.२०२२ | २५.०५.२०२२ | ०७.०७.२०२२ | ३०.०९.२०२२ |

सदर द्वितीय अपीलावर आज दि. ०७.०१.२०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपीलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ.प्र.) शहर, श्री. विनायक माने उपस्थित आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या दि. २३.०५.२०२२ रोजीच्या जोडपत्र-अ नुसार "A copy of document showing the procedure, guidelines, rules, and regulations in detail applicable while conducting the survey of eligible residents (पात्र रहिवाशी) residing at Spring Mill Chawl, G.D. Ambekar Marg, Naigaon, Dadar (E), Mumbai - 400 014. A copy of the questionnaire used while conducting the survey. 3. List of documents collected from the residents. 4. A copy of the blank form which were filled by the residents as a part of the survey. 5. A copy of the survey report." या संदर्भात माहितीची मागणी केली आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी स्प्रींगमिल व्यवस्थापन महानगरपालिकेच्या अधिकारी यांनी सदर चाळीत रहिवाशी

असलेल्या व्यक्तींची यादी कार्यालयीन अभिलेखात कलम २ (च) प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थी यांना पुरविण्यात आली आहे. तरी अपीलार्थी यांच्या म्हणणनुसार ही नावे का व कशी समाविष्ट करण्यात आली तसेच काही पात्र व्यक्तींचे नावे का वगळण्यात आली याबाबतचा खुलासा व दस्ताऐवज जन माहिती अधिकारी स्तरावरुन प्राप्त झाला नाही. तसेच मिळालेली माहिती ही अर्धवट असल्याचा आक्षेप नमूद केला असून तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.) यांनी त्यांच्या दि. २२.०२.२०२२ रोजीच्या आदेशात मुद्या क्र. १ ते ४ बाबत विचारणा केलेली माहिती कार्यालीन अभिलेखात उपलब्ध नाही. तथापि मुद्या क्र. ५ वरील माहिती उपलब्ध असल्याने अपीलार्थी यांना पाठविण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी यांची भूमिका योग्य असल्याने प्रथम अपील अर्ज निकाली काढण्यात आलेला आहे. प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल करण्यात आला असून अपीलार्थी यांना न मिळालेली माहिती त्यांच्या दृष्टिने आवश्यक असून ती देण्याची अग्रेही विनंती त्यांनी केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली व जोडपत्र-अ मधील नमूद सुसंगत अशी यादी अपीलार्थी यांना या आधीच प्रदान केली आहे. सदर द्वितीय अपील अर्ज निकाली काढावा अशी विनंती केली आहे.

प्रस्तुत प्रकरणी सादर केलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता व दोन्ही बाजू एकल्यानंतर अपीलार्थी यांना देण्यात आलेली माहिती काही नावांच्या यादी पूर्ती मर्यादित असून यासंदर्भात कलम २ (च) प्रमाणे कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेल्या नस्तीतील उपलब्ध सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रत तसेच जी माहिती अपीलार्थी यांना पुरविण्यात आलेली आहे त्यात अ.क्र.१३६ ते १५६ तीच नावे आढळून येत असून दुसऱ्या पृष्ठात अ.क्र. १ ते १५ व अ.क्र. १३६ ते १५९ मध्ये तीच नावे आढळून येत असून उपरोक्त यादीची संपूर्ण प्रत तसेच यासंदर्भात या अनुषंगाने कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली टिपणी, नोंद, नियम अथवा नियमावली ची प्रत असल्यास ती अपीलार्थी यांना विनामुल्य प्रदान करण्यात यावी. यातील जी माहिती दुसऱ्या प्राधिकरणाकडे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इतर प्राधिकरणाशी उपलब्ध असण्याची शक्यता असल्यास अपीलार्थी यांचा जोडपत्र-अ हा मर्यादित स्वरुपात संबंधित प्राधिकरणाकडे कलम ६(३) अन्वये हस्तांतरित करण्यात यावा व संबंधित प्राधिकरणात असा अर्ज प्राप्त होताच कलम ७ (१) मधील नमूद विहीत मुदतीत अपीलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. या निर्देशासह सदर द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबंद करण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission Maharashtra

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०७.०१.२०२६**